पुणे पत्रकार सह. गृहरचना संस्था (मर्यादित) रजि. नं. PNA / HSG / ६५८ ता. ३० - १ - १९७१ ता. पत्रकारनगर, पुणे - ४११ ०१६.

# पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

## वार्षिक अहवालः २०२५ - २०२६

१) पंचसमिती सभा

ह्या आर्थिक वर्षात पंचसमितीच्या एकूण १८ सभा झाल्या. सभासद उपस्थिती पुढीलप्रमाणेः- श्री. विजय सावंत-१७, श्री. विनायक पटवर्धन-१८, श्री. प्रदीप नेवाळकर-१५, श्री. अनंत शाळीग्राम-१६, श्री. अनंत बेदरकर-१५,श्री. राजाराम जोशी-१७, श्री. विजय लेले-१७, अरुंधती भिडे-१६, सु.भि.ठाकोर १६

२) २०२५ - २०२६ वर्षातील कामकाजाबाबत

१. दिनांक ६-४-२५ ची विशेष सर्व साधारण सभा :

संस्थेच्या काही सभासदांनी संस्थेच्या समाज मंदिरा साठी उपलब्ध जागे चा मालकी हक्क आज असलेल्या १०२ सभासदानच पुरताच मर्यादित रहावा आणि पुनर्निर्माणात येणाऱ्या नव्या सभासदांना त्याचा लाभ मिळू नये ह्या दृष्टी ने काय करणे शक्य होऊ शकते त्या साठी विशेष सर्व साधारण सभे ची मागणी केली होती. ह्यावर सभेत सखोल चर्चेअंती असे लक्षात आले की कायद्याच्या दृष्टी ने ते शक्य नाही आणि म्हणून असे ठरविण्यात आले की मिळणाऱ्या समाज मंदिरा च्या जागे चा उपयोग संपूर्ण सोसायटी साठी व्यापारी दृष्टिकोनातून करावा.

2. दिनांक १८-७-२५ आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पाला कॉर्पोरेशन ची IOD मिळाली.

३. दिनांक १९-७-२५ बिल्डर तर्फे आपल्या सोसायटी च्या प्लॉट च्या जमिनी ची पाहणी करण्याचे काम (Soil testing) सुरू करण्यात आले. हे काम जवळपास एक आठवडे चालले.

४. दिनांक - २१- ७ -२५ संस्थेच्या पुनर्निर्माण साठी बिल्डर चे तसेच संस्थे चे अधिकृत प्रतिनिधी यांच्यात डेव्हलपमेंट अॅग्रीमेंट वर सह्या करण्यात आल्या.

५. दिनांक - २४-७-२५ डेव्हलपमेंट अॅग्रीमेंट आणि पॉवर ऑफ अटोरनि दस्तांचे रजिस्ट्रेशन करण्यात आले.

६. दिनांक - २-८-२५ Environment Clerence साठी आवश्यक आवेदन पत्र संबंधित सरकारी विभागाला देण्यात आले.

७. दिनांक - १८-८-२५ संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पांतर्गत सभासदांना मिळणाऱ्या फ्लॅट्स च्या मजल्यांचे तसेच डुप्लेक्स चे वाटप (Allotment) कसे करायचे ह्या वर सखोल चर्चा करण्या साठी आयोजित मेळावा.

८. दिनांक २८-९-२५ दिनांक १८-८-२५ च्या मेळावा नंतर allotment ची procedure कशी असेल हे साउदाहरण समजून घेण्या साठी आयोजित सभासदांचा मेळावा.

९. दिनांक - २-११-२५ ची विशेष सर्व साधारण सभा.

ह्या सभेत सभासदांना संस्थे च्या पुनर्निर्माण प्रकल्पांतर्गत मिळणाऱ्या घरांच्या मजल्यांची तसेच डुप्लेक्स धारकांना मिळणाऱ्या नंबर ची पहिले ठरलेल्या लॉटरी पद्धतीने आणि सभासदांनी दिलेल्या तीन चॉईस च्या अनुषंगा ने, सहकारी खात्याच्या अधिकारी समक्ष, सोडत घेण्यात आली. तसेच allotment नंतर ९९ विरुद्ध ३ ह्या मताधिक्याने सोडतीचा निकाल मंजूर करण्यात आला.

१०. दिनांक - ७-१२-२५ इच्छापत्र, गिफ्ट डीड आदी विषयांवर सभासदांना सविस्तर माहिती देण्या करिता एक मेळावा आयोजित करण्यात आला.

११. दिनांक - १८-१२-२५ Ministery of Environment Forest and Climate Change ह्यांच्या कडून Maharashtra State Environment Impact Assessment Authority तर्फे आपल्या प्रकल्पा ला Environment Clearance ची परवानगी मिळाली.

१२. दिनांक - ३०-३-२६ सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पा च्या बेसिक प्लॅन ला पुणे महानगर पालिके कडून मिळालेली मंजुरी, commencement Cerificate मिळाल्याची माहिती देण्या करिता तसेच पुढील कामाचे टप्पे समजण्या साठी सभासदांचा मेळावा.

3) आभार

अहवाल वर्षात संस्थेचा कारभार चालविताना पत्रकारनगरचे सर्व सभासद, निवासी, महाराष्ट्र शासनाचे सहकार खाते, आणि पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक व अधिकारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

विजय सावंत, अरुंधती भिडे, विनायक पटवर्धन, प्रदीप नेवाळकर,
अनंत शाळीग्राम, राजाराम जोशी, अनंत बेदरकर, विजय लेले, सुरेशचद्र ठाकोर

पुणे पत्रकार सह. गृहरचना संस्था (मर्यादित)
रजि. नं. PNA / HSG / ६७८ ता. ३० - १ - १९७१
पत्रकारनगर, पुणे - ४११ ०१६